


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७६१. वा | शनिवार | दि. ०४ मे २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# दोन कारचा भीषण अपघात सहा जण ठार तीघे गंभीर जखमी...

## अकोला-वाशिम महामार्गावरील पातूर येथील घटना

### अमरावती शिक्षक मतदार संघाचे आमदार किरण सरनाईक यांच्या परिवारावर दु .खाचा डोंगर कोसळला...

वृत्तसंस्था/अकोला

अकोला- वाशिम महामार्गावर शुक्रवार, ३ मे रोजी दुपारी पातूर येथील उड्डाणपुलाजवळ दोन कारची समोरासमोर धडक झाली या भीषण अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला असून, तीनजण गंभीर असल्याची माहिती पोलिसांनी दिली. जखमींवर अकोला येथील रुग्णालयात उपचार सुरू आहे. शिक्षक आमदार किरण सरनाईक यांच्या नातेवाइकाचे कुटुंब हे कारने (क्रमांक एमएच ३७-वी ५११) वाशिमकडून अकोल्याकडे येत होते. दरम्यान, विरुद्ध दिशेने येणाऱ्या कारची (क्रमांक एमएच ३०-बीएल २५७२) पातूर येथील उड्डाणपुलाजवळ समोरासमोर धडक झाली. यामध्ये रघुवीर अरुणराव सरनाईक (२८, रा. वाशिम), शिवानी अजिंक्य आमले (३०, रा. नागपूर), अस्मिरा अजिंक्य आमले (९ महिने, रा. नागपूर) व आस्तूल



रहिवासी अमोल शंकर ठाकरे (३५), कपिल प्रकाश इंगळे (३७), सिद्धार्थ यशवंत इंगळे (३५) हे सहा जण ठार झाल्याची प्राथमिक माहिती आहे. जखमी पीयुष देशमुख (११), सपना देशमुख (४१), श्रेयस सिद्धार्थ इंगळे आहे.(३) यांच्यावर अकोला येथील वेगवेगळ्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जखमींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती

प्राप्त झाली. अपघाताची माहिती प्राप्त होताच पातूर पोलिस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक भुसारी हे सहकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले होते पोलिसांनी जखमींना रुग्णालयात उपचाराकरिता पाठविले. घटनास्थळी पोलिस अधीक्षक बच्चन सिंह यांनी भेट देऊन पाहणी केली. पुढील तपास ठाणेदार किशोर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे

# दहिगाव येथील ४५ वर्षीय इसम बेपत्ता

जनसंचलन/ नांदुरा

तालुक्यातील ग्राम दहिगाव येथील ४५वर्षीय इसम कामावर जातो असे सांगून घरुन निघून गेला मात्र कामावर न जाता तो कुठेतरी निघून गेल्याची घटना २९ एप्रिलच्या सकाळी ११ वाजे दरम्यान घडली आहे याबाबत बेपत्ता इसमाची पत्नी माया गजानन कल्याणकर रा. दहिगाव





यांनी नांदुरा पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे की, माझे पती गजानन रामभाऊ कल्याणकर वय ४५ वर्षे हे घरी येऊन कपडे बदलून कामावर जातो असे सांगून घरुन निघून गेले त्यानंतर पतीच्या मालकाचा फोन आला की तुमचे पती कामावर आले नाहीत त्यांना कामावर पाठवा त्यामुळे पतीचा गावात नातेवाईकांकडे तसेच आजूबाजूच्या परिसरात सर्वत्र शोध घेतला मात्र ते कुठेही मिळून आले नाही.

त्यांचे वर्णन पुढील प्रमाणे आहे. वय ४५ वर्षे, उंची- १६५ सेंटीमीटर, रंग-सावळा,अंगात - काळ्या रंगाचा साधा राखाडी फुलपॅन्ट, रंगाचे शर्ट, फुलबाह्याचे पायात-काळ्या रंगाची चप्पल, केस काळे पांढरे, दाढी वाढलेली, डोळे- काळे असून उपरोक्त वर्णनाच्या इसमा बाबत कोणतीही माहिती असल्यास नांदुरा पोऊनी चंद्रकांत मोरे यांच्या ९८८१५६५९३१ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीसांच्या वतीने करण्यात आले आहे.

# मित्राच्या लग्नाला जात असताना वाशिममधील अपघातात मेहकरचे दोन युवक ठार

जनसंचलन/मेहकर

वाशिम जिल्ह्यात घडलेल्या अपघातात मेहकर येथील दोन युवक जागीच ठार तर तीन जण जखमी झाले. ही घटना २ मे रोजी रात्री मंगळरुळपीर रस्त्यावर कोळंबी फाट्याजवळ घडली. अंकित खडसे (२८) आणि निखिल शेळके (२९) अशी मृतकांची नावे आहेत. मेहकर येथील संतोषी माता मंदिर परिसरात राहणाऱ्या धनंजय देशमुख यांचे लग्न मानोरा (जि. वाशिम) येथे होते. या लग्नासाठी त्यांचे मित्र आपल्या





खासगी चारचाकी गाडी क्र. एमएच २० ईजे ८०४४ ने मानोरा गेले होते. यावेळी समोरून येणाऱ्या कारने त्यांच्या कारला जबर धडक दिली. यामध्ये अंकित खडसे आणि निखिल शेळके या दोघांचा जागीच मृत्यू झाला. तसेच केनवड (ता. रिसोड जि. वाशिम)येथील शुभम विजय गोळे

याच्या डोक्याला उजव्या बाजूने मार लागलेला आहे, तर मेहकर येथील प्रशांत कैलास रहाटे व डोणगांव (ता. मेहकर) येथील निखिल राजेश बाजड हे किरकोळ जखमी झालेले आहेत. अपघातात दोन युवकांचा मृत्यू झाल्याने मेहकर शहरात हळहळ व्यक्त होत आहे. दोन्ही वाहनांचेही मोठे नुकसान झाले

# अवधा येथील खून प्रकरणातील आरोपीला आजन्म सश्रम कारावास

जनसंचलन/ नांदुरा

तालुक्यातील अवधा बु येथे ८ जून २०१० रोजी मृतक रवींद्र महादेव इंगळे यांच्यावर आरोपी विठ्ठल किसन इंगळे याने भाल्याने हल्ला करून त्यांची हत्या केल्याची घटना घडली होती. याप्रकरणी नांदुरा पोलीस



ठाण्यात भादंवीच्या कलम ३०२ अन्वये गुन्हा नोंद करीत पोलिसांनी सखोल तपास करीत तपासाअंती आरोपीविरुद्ध मलकापूर येथील सत्र न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले होते. सदर प्रकरणात एकूण १३ साक्षीदार तपासण्यात आले या प्रकरणात मृतकाची पत्नी व अन्य साक्षीदार व वैद्यकीय अधिकारी यांच्या पुराव्यामुळे आरोपी विठ्ठल इंगळे याच्या विरुद्ध

गुन्हा सिध्द झाल्याने आरोपीला २ मे रोजी जिल्हा व सत्र न्यायाधीश पी. आर. कदम यांनी आजन्म सश्रम कारावास व ३० हजार रु दंड ठोठावला आहे. या प्रकरणात सरकार पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता विवेक बापट यांनी युक्तिवाद केला. तसेच या हत्याप्रकरणाचा संपूर्ण तपास नांदुरा पो स्टे चे तत्कालीन पोलीस निरीक्षक अनिल पाटील व त्यांचे रायटर पोहेकॉ राजु चौधरी यांनी केला होता

# दोघांना मोटरसायकलवर लिफ्ट दिली त्यांनीच शेतकऱ्याला लुटले...

**जनसंचलन/मोताळा**

खरबडी येथील दोघांना लिफ्ट देणे एका शेतकऱ्याला चांगलेच महागात पडले आहे. दोघांनी धमकी देत व चाकूचा दाख दाखवत पैसे हिसकावल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणाची पोलिसांना तक्रार प्राप्त होतात, अवघ्या काही वेळातच दोन्ही आरोपींला अटक करण्यात आले. याबाबत संजय पारस्कर (रा. भोटा ता नांदुरा) यांनी बोराखेडी पोलीस ठाण्यात रविवारी ३० एप्रिलला फिर्याद दिली. राजेश सोळंके, शेख मुनाफ(रा. खरबडी) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. सविस्तर वृत्त असे की, संजय पारस्कर हे त्यांच्या गावावरुन शिरवा येथे जाण्यासाठी निघाले होते. दरम्यान, खरबडी येथील चौकात चहा घेत असताना दोन अनोळखी तरुण त्यांना भेटले. तुम्हाला कुठे जायचे असे विचारले असता शिरवा येथे जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. आमच्या दोघांना सुद्धा शिरव्यालाच जायचे आहे त्यामुळे तुम्ही आम्हाला तुमच्या मोटरसायकलवर घ्या, असे त्यांनी सांगितले. त्यानंतर दोघांपैकी एकाने मोटरसायकल चालवायला घेतली. आणि एक जण मागे बसला होता. तिघेजण शिरव्याच्या दिशेने निघाले. त्यानंतर बुलडाणा रोडवरील ग्रीनपार्क बार ॲण्ड रेस्टारंट जवळ त्याने गाडी थांबवली. आम्हाला पुढ्या घेवुन द्या, असे म्हणत ग्रीनपार्क बार ॲण्ड रेस्टारंट मध्ये नेवुन तेथे गेल्यावर दोघांनी दारुची मागणी केली असता संजय पारस्कर यांनी दोघांना नकार दिला. दुचाकी चालवणाऱ्या तरुणाने दुचाकी परड्या फाट्यासमोर घेतल्याने परडा मार्गे शिरवा घ्या असे ते म्हटले. परंतु पाठीमागे बसलेल्या तरुणाने फिर्यादी संजय यांच्या पोटाला चाकु लावुन तु आरडाओरड केल्यास तुला मारुन टाकु अशी धमकी दिली. त्यानंतर दुचाकी खामखेड गावाचे समोर राहेरा रस्त्यावर दोघांनी लावली आणि खिशात हात टाकून , चाकूचा धाक दाखवत १२ हजार हिसकावून




घेतले व दोघे तेथून पळ काढला. त्यानंतर संजय पारस्कर यांनी दुचाकी घेतली आणि पोलीस स्टेशन गाठले. पोलिसांना घडलेली हकीकत सांगितली, त्यानंतर पोलिसांनी त्यांना सोबत घेत ग्रीन पार्क बार येथे गेले. त्याठिकाणी सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. पोलिसांनी तत्काळ तपास सुरू करून काही वेळाने पोलीस हेड कॉन्स्टेबल नंदकिशोर धांडे, प्रविण पडोळ, विनोद नरोटे यांनी दोघा आरोपींना ओळखुन त्यांच्या घरून ताब्यात घेतले. पोलीस स्टेशनला आणले असता फिर्यादी संजय पारस्कर यांनी दोन्ही आरोपीला ओळखले, त्यानंतर दिलेल्या तक्रारीवरून दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ताडशिवणी, राहेरी बुद्रूक, दुसरबीड गावातून रात्रंदिवस वाळूची तस्करी सुरू!

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**




वाळूतस्करांविरोधात मध्यंतरी सिंदखेडराजा महसूल विभागाने सुरू केलेली धडक कारवाई आता अचानक व आश्चर्यकारकरित्या थांबली गेली असल्याचे दिसून येत आहे. तर वाळूतस्करांनी पुन्हा एकदा उच्छाद मांडला असून, जोरात वाळूतस्करी सुरू आहे. खास करून ताडशिवणी, राहेरी बुद्रुक व दुसरबीड गावातून खुलेआम व रात्रंदिवस वाळूचे डंपर वाळूचोरी करताना दिसून येत आहेत. विशेष बाब म्हणजे, राहेरी बुद्रूक या गावातून पाताळगंगा व नागपूर डाकलाईन, भगवती मंदीर वरती असलेल्या शेतांमधून वाळूचे डंपर सोडण्यासाठी काही शेतकरी वाळूचोराकडून प्रतिडंपर ५०० रूपये घेत असल्याने काही शेतकर्यांचाही वाळूचोरांना पाठिंबा असल्याचा धक्कादायक प्रकार ब्रेकिंग महाराष्ट्र्या पाहणीतून आढळून आला आहे. याबाबत सिंदखेडराजा-देऊळगावराजा तालुका विकास संघर्ष समितीच्यावतीने लवकरच महसूल मंत्री व जिल्हाधिकारी यांच्याकडे सविस्तर तक्रार दाखल केली जाणार असल्याचे या समितीचे अध्यक्ष अनिल दराडे यांनी दिली आहे. सविस्तर असे, की ताडशिवणी, राहेरी बुद्रूक, दुसरबीड या गावांमधून रात्रंदिवस अवैध रेती उपसा जोरात सुरू असल्याने महसूल विभागाचा खूप मोठ्या प्रमाणात महसूल बुडत आहे. राहेरी बुद्रूक या गावामधून पातळगंगा व नागपूर डाक लाईन व भगवती मंदिर वरती असलेल्या शेतामधून शेतकरी आपल्या शेतामधून वाळूतस्करांची वाहने सोडण्याकरिता प्रतिवाहन पाचशे रुपये उकळत आहेत. ताडशिवनी या गावातून टिप्परवाले राजेरोषपणे रेती उपसा करत असून, ही माहिती स्थानिक तलाठी टेकाळे व दुसरबीड येथील मंडळ अधिकारी पदाचा कारभार असलेले राहुल देशमुख व सिंदखेडराजा येथील महसूल विभागातील अधिकारी यांना फोन व व्हाटसअपद्वारे दिली असता, ते काहीही कारवाई करताना दिसत नाहीत. त्यामुळे या अधिकार्यांच्या संगनमताने वाळूतस्करी सुरू आहे का, असा सवाल संतप्त ग्रामस्थ व शेतकरी करत आहेत. या वाळूतस्करीपोटी महिनाकाठी कोट्यवधी रूपयांचा महसूल बुडत असून, यापैकी किती या अधिकार्यांच्या खिशात जात आहे, याबाबत संतप्त प्रतिक्रिया ग्रामस्थांतून उमटताना दिसत आहेत. या भागातील नदीपात्रांचा पंचनामा करण्यात येऊन, तसेच शेतरस्त्यांची पाहणी केल्यास मोठ्या प्रमाणात वाळचोरीचा प्रकार उघडकीस येईल. त्यामुळे अवैध रेतीउपसा झालेल्या नदीपात्रांचे मोजमाप व पंचनामे करण्यात यावे, या मागणीसाठी लवकरच सिंदखेडराजा-देऊळगावराजा तालुका विकास संघर्ष समितीच्यावतीने जिल्हाधिकारी व महसूलमंत्री यांच्याकडे निवेदन दिले जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे. राहेरी बुद्रूक येथील ट्रॅक्टरवाले आणि ताडशिवणी, लिगा, पिंपळगाव, कुडा, दुसरबीड, जळका येथील वाळचोरी करणारे काही टिप्पर, जेसीबीवाले या वाळूतस्करीतून मालामाल होत असून, त्यांना या भागातील मंडल अधिकारी, तलाठी, सिंदखेडराजाचे तहसीलदार यांचा आशीर्वाद असल्याची परिसरात जोरदार चर्चा सुरू आहे.

# जऊळका येथील जलजीवन मिशनचे बंद पडलेले काम त्वरीत सुरु करून पाणी पुरवठा सुरळीत करण्याची निवेदन देवुन सरपंचाची मागणी...

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

सिंदखेडराजा तालुक्यातील मौजे जऊळका येथे मागील १६महिण्यापासून जल जीवन मिशन च्या माध्यमातून गावाच्या पाणीपुरवठ्याच्या पाईप लाईनचे काम अतीशय संथगतीने सुरू असून सध्या गेल्या अनेक दिवसा पासुन बंद आहे त्यामुळे सदर काम त्वरीत सुरू करुन गावात पाणीपुरवठा सुरु करावा अशी मागणी सरपंच गजानन मुंडे यांनी आज दि ३ मे रोजी मुख्य कार्यपालन आधीकारी यांना निवेदन देवुन केली आहे सदर काम हे शासकीय कंत्राटदार अनिल सखाराम मात्रे यांना मिळालेले आहे. असे असतांना सदर कंत्राटदार हे काम सुरु केल्यापासून च आजपर्यंत अतिशय संथगतीने करत आहे आता गेल्या एका महिण्यापासून काम पुर्ण पणे बंद आहे. असे असतांना सद्या मे महीना असल्याने गांवामध्ये भिषण पाणी टंचाई भासत असून पाण्या अभावी गांवातील नागरीकांचे प्रचंड हाल होत आहे. त्यासाठी



ग्रामपंचायत कार्यालय, जऊळका
पंचायत समिती सिंदखेड राजा ता.सिंदखेडराजा जि.बुलडाणा

* सरपंच * श्री.गजानन एस.मुंढे Mo.9552726130
* सचिव * श्री.डी.व्ही.डोंगरदिवे Mo.7498655538

जा.क्र. दिनांक : ०२/०५/२०२४

प्रति,
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब,
जिल्हा परिषद, बुलडाणा

विषय :-मौजे जऊळका येथील जलजीवन मिशनचे बंद पडलेले काम त्वरीत सुरु करून पाणी पुरवठा सुरळीत करणे बाबत.

महोदय,
उपरोक्त विषयास अनुसरून सेवेशी सविनय अर्ज सादर करतो की, मौजे जऊळका ता.सिंदखेडराजा जि.बुलडाणा येथे मागील १६महिण्यापासून जल जीवन मिशन चे काम अतीशय संथगतीने सुरू असून सदर काम हे शासकीय कंत्राटदार अनिल सखाराम मात्रे यांना मिळालेले आहे. असे असतांना सदर कंत्राटदार हे काम अतिशय संथगतीने सुरु असून सदर काम हे मागील एका महिण्यापासून बंद आहे. असे असतांना सद्या गांवामध्ये भिषण पाणी टंचाई भासत असून पाण्या अभावी गांवातील नागरीकांचे खुप हाल होत आहे. सदर काम त्वरीत पुर्ण करणे बाबत ठेकेदार यांना वारंवार विनंती केली असता त्यांनी आतापर्यंत माझ्या विनंतीचा कोणताही मान न ठेवता सदर काम हे बंदच ठेवलेले आहे. सदर काम हे दिनांक १५/०५/२०२४ रोजीपर्यंत पुर्ण करून गांवामध्ये पाणी न आनल्यास दिनांक १६/०५/२०२४ रोजी मी स्वत: सरपंच गजानन साहेबराव मुंढे ग्रा.पं.कार्यालय जऊळका कार्यालया समोर अमरण उपोषणास बसणार आहे.
तरी मा.साहेबांना नम्र विनंती की, सदर कंत्राटदारावर योग्य ती कारवाई करून सदर काम हे दिलेल्या मुदतीमध्ये पुर्ण करण्याचे आदेश देण्यात यावे ही नम्र विनंती.
करीता सेवेशी सविनय सादर.

सरपंच
ग्रा.पं. कार्यालय जऊळका

प्रतिलिपी,
१) मा.कार्यकारी अभियंता साहेब, ग्रामिण पाणी पुरवठा विभाग,बुलडाणा
२) मा.उपविभागीय अधिकारी साहेब, ग्रामिण पाणी पुरवठा उपविभाग,चिखली
३) मा.तहसिलदार साहेब, तहसिल कार्यालय,सिंदखेडराजा
४) मा.गट विकास अधिकारी साहेब, पंचायत समिती सिंदखेडराजा
५) मा.ठाणेदार साहेब, पोलीस स्टेशन किनगांव राजा

काम त्वरीत पुर्ण करण्यासाठी सदर ठेकेदार व सबंधीत आधीकारी यांना लेखी वजा तोंडी वारंवार विनंती केली असतांनाही त्यांनी आतापर्यंत आमच्या मागणी चा कोणताही दखल घेतली नाही उलट सदर काम हे बंदच ठेवलेले आहे. त्यामुळे सदर काम हे दि १५ मे पर्यंत पूर्ण करून गावात पाणी न आणल्यास दि १६ मे रोजी मी गावकर्यांसह ग्रा. पं. कार्यालया समोर अमरण उपोषणास बसणार आहे त्यामुळे सबंधीत विभागाच्या वरीष्ठ अधिकार्यांनी सदर ठेकेदारावर योग्य ती कारवाई करुन दिलेल्या मुदतीतकाम पुर्ण करुन गावात पाणीपुरवठा सुरु करावा अशी मागणी सरपंच गजानन मुंडे यांनी निवेदन देवुन केली आहे

# वृद्धाने केला अल्पवयीन मुलीचा विनयभंग...

**जनसंचलन/ खामगाव**

एका ६० वर्षीय वृद्धाने अल्वयीन मुलीचा विनयभंग केला. खामगाव तालुक्यातील एका गावात ही घटना गुरूवारी घडली. तक्रारीनुसार, एका अल्पवयीन मुलीच्या अंगाला स्पर्श करून ६०- वर्षीय वृद्धाने विनयभंग केला. याप्रकरणी पीडितेच्या तक्रारीवरून हिवरखेड



पोलिसांनी वृद्धा विरोधात पोक्सो कायद्यासह अन्य कलमान्वये गुन्हा दाखल केला. प्रकरणात आरोपीला तत्काळ अटक करण्यात आली. पुढील तपास हिवरखेड पोलिस करीत आहेत.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# इसरुळ येथील कलंदर बाबाचा संदल शांततेत..!

## हजारो भाविकांनी घेतला दर्शन व महाप्रसादाचा लाभ

**जनसंचलन/ चिखली**

चिखली तालुक्यातील इसरुळ येथील सर्व जाती-धर्मियांचे श्रद्धास्थान असलेले दादा हयात कलंदर बाबाचा संदल दिनांक २ मे २०२४ रोजी गुरुवारला रात्री मोठ्या उत्साहात व शांततेत पार पडला. तसेच संदल निमित्त बाहेर गावावरून आलेल्या हजारो भाविक भक्तांनी दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. या महाप्रसादाचे आयोजन इसरुळचे लोकनियुक्त सरपंच तथा चिखली तालुका सरपंच संघटनेचे अध्यक्ष श्री सतीश पाटील भुतेकर यांच्या वतीने करण्यात आले.

महाप्रसादाचे वाटप अंढेरा पोलीस स्टेशन ठाणेदार विकास पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. विदर्भ व मराठवाडा सीमेवर वसलेले इसरुळ हे गावं.. लाखों भाविकांचे श्रद्धास्थान रजी. नं.बी.१४० असलेले दादा हयात कलंदर बाबांचा संदल व दर्शनासाठी दरवर्षी येथे मराठवाड्यासह विदर्भातील भाविकांची याठिकाणी नेहमीप्रमाणे एकच गर्दी होते. जवळपास १०५ वर्षापासून ही परंपरा चालत आलेली आहे. एकूण तीन दिवसीय चालत असलेल्या या यात्रेत यावर्षी यात्रेतील कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी गुरुवार २ मे रोजी संदल पार पडला तर आज दि. ३ मे रोजी उर्स शरीफक्वं असून रात्री ८:०० वाजता परवीन अजमेरी व समीरताज यांच्या शानदार कव्वालीचा मूकाबला होणार आहे. त्याचप्रमाणे यात्रेच्या शेवटच्या दिवशी ४ मे रोजी शनिवारला दादा हयात कलंदर बाबा यांच्या दर्ग्यावर सकाळी फातेहाखानी व महाप्रसाद वितरण होणार आहे. अतिशय भक्तिमय व आनंदमय अशा वातावरणात इसरूळ (नवीन गावठाण) गावातून ढोल ताशाच्या गजरात व नगाऱ्यांच्या धूम धडाक्यात उंटनी वरून मुजावर शेख रज्जाक शेख अकबर यांच्या राहत्या घरून सायंकाळी ५:३० वाजता निघालेला संदल रात्री १ वाजता अतिशय शांततेत व भक्तिमय वातावरणात कलंदर बाबां दर्ग्यावर पोहोचला. बाबांच्या मदारवर चादर चढविताना त्या चादर ला हात लावण्यासाठी व दर्शनासाठी हजारो भाविकांनी एकच गर्दी केली होती.

संदल शांततेत पार पाडण्यासाठी सरपंच सतीश पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष कृष्णा काळे, ठाणेदार विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जारवाल, इसरुळ बिटचे जमादार सोनकांबळे, यांच्यासह पोलीस पाटील जयपाल वायाळ हे लक्ष ठेवून होते. यावेळी मुजावर शेख रज्जाक शेख अकबर यांच्या सुचनेनुसार गावातील प्रतिष्ठित गजानन भुतेकर, विनायक पाटील, समाधान पाटील, दिपक पुंगळे, राज पाटील,मोबीन शेख, जावेद शेख, अमोल पाटील, जाकिर शेख, माजी सरपंच पती संतोष भुतेकर, विठ्ठल भुतेकर, मिलिंद भुतेकर, आसिफ शेख, मैंनूभाई, गंगाधर भुतेकर, कलीम शेख, सत्तार शेख, हरुण शेख, पत्रकार भिकनराव भुतेकर या आदी लोकांसह अनेक गावातील तरुण सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच संपूर्ण गावकऱ्यांनी यास सहकार्य केले.

# अमडापूर येथे डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे शेतकऱ्याला गमावावी लागली दीड लाखाची गाय

## डॉक्टरांअभावी २५ हून अधिक पाळीव जनावरांचा मृत्यू

**जनसंचलन/चिखली**

चिखली येथील अमडापूर हे सर्वात मोठे गाव असून या गावातील दवाखान्याला जवळपास १७ गाव जोडलेले आहे. परंतु गेल्या सहा महिन्यांपासून येथील दवाखान्यात पशुवैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे योग्य उपचारा अभावी अनेक शेतकऱ्यांची जनावरे दगावली आहे. शेतकरी संदीप नागरे व शेतकरी यांनी दिलेल्या माहितीनुसार जवळपास आतापर्यंत २५ हून अधिक पाळीव प्राण्यांचा मृत्यू झाला आहे. अतिशय दयनीय अवस्था या दवाखान्याची आहे. याच अवस्थेपायी अमरापूर येथील शेतकरी संदीप विश्वनाथ नागरे वय वर्ष ३९ यांची होस्टन प्रकारात मोडणारी दीड लाखाची गाय डॉक्टरांचा हलगर्जीपणा मुळे मृत्यू पावली आहे. अशा प्रकारची तक्रार त्यांनी अमडापूर पोलीस स्टेशन संदीप नागरे येथे दाखल केली आहे. नागरे यांच्याकडे गौरी डेअरी असून ती स्वतः डेअरीचा व्यवसाय करतात त्यांच्याकडे दुधाळ व पाळीव जनावरे असून ते दूध व्यवसाय करतात. यामध्ये त्यांच्याकडे होस्टन काळ्या पांढऱ्या रंगाची गाय अंदाजे चार वर्षे ही गाय गाभण असताना ती आजारी पडली. त्यांनी १८ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजताची सुमारास गाय उपचारासाठी अमडापूर येथील सरकारी गुरांचा दवाखाना येथे नेली असता, डॉक्टर उपलब्ध नव्हते. यावेळी परिचारक रमेश मस्के हे तेथे उपस्थित होते. त्यांनी नागरे व आदी शेतकऱ्यांना प्रथम दोन तास बसून ठेवले. यावेळी तेथील पशुवैद्यकीय डॉक्टर उईके मॅडम उपस्थित नव्हत्या. यावेळी शेतकरी संदीप नागरे यांनी उईके मॅडम यांना कॉल केला व सर्व प्रकारची माहिती दिली तुम्ही लवकर माझ्या गाईचा इलाज करा. तुम्ही जर आल्या नाही तर मला आत्महत्या करावी लागेल असे ते म्हणाले असता डॉक्टर उईके मॅडम यांनी त्यांना तुम्ही फाशी घ्या काहीही करा पण मी आता येऊ शकत नाही अशा भरपूर महागड्या गाई मी पाहिले आहेत असे म्हणून त्यांनी फोन बंद केला. व तेथे उपस्थित असलेले परिचारक रमेश मस्के यांनी शेतकऱ्यांच्या हातामध्ये दोरी दिली व फाशी घ्या असे म्हणाले. त्यानंतर शेतकरी निराश अवस्थेत घरी निघून गेले व विस्तार अधिकारी पडोळकर यांना फोन लावून त्यांच्याकडून गाई वर घरी उपचार करून घेतले. परंतु जर अमडापूर येथील पशुवैद्यकीय डॉक्टर उईके मॅडम यांनी योग्य वेळी गाईवर उपचार केले असते तर शेतकऱ्याची गाय मृत्युमुखी पडली नसती व शेतकऱ्यांचे दीड लाखाचे नुकसान झाले नसते. त्यामुळे गाईवर योग्य वेळी उपचार न भेटल्यामुळे ३० एप्रिल रोजी सकाळी साडेआठ वाजताच्या सुमारास ती मरण पावली आहे. अशा प्रकारची तक्रार संदीप नागरे या शेतकऱ्यांनी अमडापूर पोलीस स्टेशन येथे दिली आहे. मला गाईची नुकसान भरपाई मिळावी तसेच अमडापूर येथील पशुवैद्यकीय सरकारी दवाखान्यात चांगला पूर्णवेळ हजर असणारा डॉक्टर उपलब्ध करून द्यावा अशा प्रकारची मागणी अमडापूर येथील शेतकऱ्यांनी केली आहे.



अन्यथा संतप्त शेतकरी दहा मे २०२४ रोजी पशुवैद्यकीय विस्तार अधिकारी यांच्या दालनाला कुलूप ठोकून तीव्र आंदोलन करू अशा प्रकारचा गर्भित इशारा शेतकरी संदीप नागरे, अमोल पाबरे, राम देशमुख, संदीप नागरे, अशोक जाधव,मदन वाखरे, शेख नईम शेख, गणेश आदमाने, शेख अलम शेख गुलाब, विनोद कवळे, संतोष लंबे, कारखेड, पुरुषोत्तम जवले, टाकरखेड, नागेश हरकाळ, शेख इमरान, सय्यद फारूक, व आधी २०० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी दिला आहे. अमडापूर येथे गेल्या सहा महिन्यांपासून डॉक्टर उपलब्ध नाही. डॉक्टरांना फोन केला असता ते उद्धट भाषेत बोलतात. चक्क शेतकऱ्यांनाच ते फाशी घ्यायला लावतात. त्यांचा परिचारक मस्के हा तर शेतकऱ्याच्या हातात फाशी घेण्यासाठी दोरी आणून देतो. डॉक्टर उईके मॅडम या सुद्धा तशाच प्रकारे शेतकऱ्यांना उत्तर देतात. शेतकऱ्यांनी अशा डॉक्टरांसमोर करावी तरी काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे. अशा डॉक्टरांवर योग्य कारवाई करून त्यांना निलंबित करावे अशी मागणी संदीप नागरे, अमोल पाखरे, जगदीश कोठारी, शेख नईम व आधी शेतकऱ्यांनी केली आहे.

# ४८ तासांच्या आत लावला पळवून नेलेल्या अल्पवयीन मुलीचा शोध !

**जनसंचलन/मेहकर**

पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या एका गावातून १३ वर्षांच्या अल्पवयीन मुलीला अज्ञात आरोपीने फूस लावून पळवून नेले होते. डोणगाव पोलिसांनी अवघ्या ४८ तासांच्या पळवून नेलेल्या अल्पवयीन मुलीचा शोध लावून पालकांच्या स्वाधीन केले. एका महिलेने तिच्या १३ वर्षाच्या अल्पवयीन मुलीला अज्ञात आरोपीने डोणगाव पोलिसात दिली होती. त्या तक्रारीवरून पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली, ठाणेदार अमरनाथ नागरे यांच्या मार्गदर्शनात बिट जमादार सतीश मुळे यांनी तांत्रिक बाबींच्या आधारे व सायबर सेलच्या मदतीने पीडित मुलीचा शोध सुरू केला. तसेच गावातील विविध ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज पाहून पीडिता ही खासगी बसमध्ये गेल्याची माहिती मिळाली. यांनी खासगी बसचा शोध घेऊन पीडित ही पुणे येथे गेल्याची माहिती मिळवली. उपविभागीय पोलिस अधिकारी यांनी तत्काळ पुणे येथे




जाण्याची सूचना केली. ठाणेदार नागरे यांनी बिट जमादार सतीश मुळे, पोलिस कॉन्स्टेबल नितीन डुकरे यांना तत्काळ पुणे येथे रवाना केले. बिट जमादार सतीश मुळे व त्यांच्या पथकाने वसुली फाटा महालुंगी पुणे येथे जाऊन

# दे. राजा शहरातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याची मागणी

**जनसंचलन/ देऊळगावराजा**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी होत असलेल्या पलभट्टी देवीच्या उत्सवासाठी मार्गावरील रस्त्यांची स्वच्छता करावी, तसेच रस्त्यावरील खड्डे बुजवून उघड्या नाल्या बंद कराव्यात, तसेच पुरेशी प्रकाश व्यवस्था करण्याची मागणी नागरिकांनी नगरपालिकेला दिलेल्या निवेदनात केली आहे. देऊळगावराजा शहरातील प्रसिद्ध असलेला पलभट्टी देवीचा उत्सव ५ मे रोजी होणार आहे. परंतु, पलभट्टी देवीच्या मार्गावरील रस्त्यांची स्वच्छता करणे आवश्यक आहे. कारण, या मार्गावर अनेक ठिकाणी घाण साचलेली आहे. देवीचा उत्सव रात्री असल्याने आवश्यक त्या ठिकाणी मोठे लाइट लावून प्रकाश व्यवस्था करण्यात यावी, अशा मागणीचे निवेदन नगरपालिकेकडे करण्यात आले आहे. निवेदन देताना सूरज हनुमंते, ॲड. राजू मांटे, बलवंत सिंग बावरे, मुन्ना ठाकूर, विठ्ठल निंबाळकर आदींनी केली.

# जुहू ते मरिन ड्राईव फक्त ३० मिनिटात...

## महानायक अमिताभ बच्चन यांनी केलं फडणवीसांच्या कामाचं कौतुक!

**वृत्तसंस्था/मुंबई**

वाह, क्या बात है, साफ सुथरी नयी बढीया सडक, कोई रूकावट नही अशा शब्दात महानायक अमिताभ बच्चन यांनी फडणवीसांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या कोस्टल रोडचे कौतुक केले. आपल्या कामानिमित्त मरीन ड्राईव्हला जात असताना त्याणी सिलिंक ते कोस्टल रोड ते अंडरग्राऊंड टनेल असा प्रवास केला तो अवघ्या तीस मिनिटात. या विषयीचे ट्विट करत त्यांनी कोस्टल रोडचे कौतुक केले. तर परंपरा, प्रतिष्ठा, अनुशाषन हे या सरकारचे तीन स्तंभ आहेतफ अशी डायलॉगवजा प्रतिक्रीया आपल्या रिट्विट मधून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुंबई बदलतेय,आम्ही मुंबईकरांचा प्रवासाचा वेळ कसा कमी करता येईल यावर काम करत आह-ोत असेही फडणवीसांनी सांगितले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचा ड्रीम प्रोजेक्ट म्हणून कोस्टल रोडकडे पाहिलं जात होतं. आधी त्यांनी अटल सेतूचं काम मागच्या मुख्यमंत्रीपदाच्या टर्ममध्ये हाती घेतलं होतं. ते यशस्वी केलं. त्यांचा दुसरा ड्रीम प्रोजेक्ट निकाली काढण्यासाठीच्या हलचाली त्यांनी सुरु केल्या होत्या. एकीकडे फडणवीस निवडणूक प्रचारात गुंतले आहेत. दुसऱ्या बाजूला कोस्टल रोडचे काम प्रगती पथावर आहे.काही दिवसांपूर्वीच मुंबईकरांसाठी वरदान ठरणारा कोस्टल रोडचं काम पुर्ण झालं आहे.




या क्रमात कोस्टल रोड आणि वांद्रे वरळी सी लिंक यशस्वी रित्या जोडण्यात आला आहे. बो आर्क स्ट्रिंग गर्डरद्वारे ही मोहिम फत्ते करण्यात आली होती. त्यामुळे कोस्टल रोडवरची वाहतूक थेट सी लिंकवर नेता आली. मुंबईकरांची ट्राफिकपासून सुटका करण्यासाठीचं हे महत्त्वाचं पाऊल होतं. गर्डर जोडण्यासाठी समुद्रातील उंच आणि कमी भरतीचा वापर करण्यात आला. अत्यंत नियोजनपुर्ण पद्धतीने हे काम करणारण्यात आलं. गर्डरद्वारे हे दोन्ही मार्ग जोडण्याचा भारतातील अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयोग झाला आहे. कोस्टल रोड प्रकल्पाचा प्रस्ताव पहिल्यांदा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी २०१३ साली मांडला होता. मात्र, प्रत्यक्षात कामाला सुरुवात झाली ती २०१७-१८ साली. तेव्हा राज्याचे मुख्यमंत्री पद होतं देवेंद्र फडणवीस यांच्याकडे. शिवसेना युतीमध्ये त्यांच्यासोबत होती. पुढं मात्र चित्र पालटलं. २०१९ ला राज्यात मोठा सत्ता प्रयोग झाला. महाविकास आघाडीचं सरकार बनलं. यानंतर उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतली, परंतु कोरोनाचा तडाखा बसला. कोरोनातून सावरल्यानंतरही प्रकल्पाला म्हणावं त्या वेगानं पुढं ढकलं गेलं नसल्याचा आरोप झाला. यादरम्यान विरोधी बाकावर बसलेल्या भाजपने जोरदार टीका केली होती. अडीच वर्षांनंतर महाविकास आघाडीचं सरकार सत्तेतून खाली खेचण्यात आलं. महायुती सत्तेत आली. आता त्यांच्या काळात हा प्रकल्प पुर्णत्त्वास गेला.

# बुलडाणा शहरातील मंगल कार्यालय मालकांची बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात बैठक



**जनसंचलन/बुलढाणा**


बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात आज शुक्रवार , ३ मे रोजी शहरातील मंगल कार्यालय मालकांची बैठक पार पडली. लग्न समारंभात, तसेच इतर कार्यक्रमाच्या दरम्यान डीजे तसेच वाद्यांमुळे वाहतुकीची मोठी समस्या होते.डिजेचा मुद्दा हा केवळ शहरातचं नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यात तणावाचा विषय ठरला आहे.विविध गंभीर स्वरूपाच्या घटना या डिजेमळे शहरात घडल्या आहे. गेल्या १४ एप्रिल रोजी बुलढाणा शहरात गंभीर स्वरूपाचा गुन्हा घडला आहे.एका युवकांची चाकू खूपसून हत्या करण्यात आली आहे. हि बाब अतिशय गंभीर आहे.इतर सुध्दा काही घटना या जिल्ह्यामध्ये घडल्या आहे. शिवाय तणावाची परिस्थिती ही निर्माण होऊ शकते. त्यामुळे मंगल कार्यालय प्रशासनाने पार्किंग व्यवस्था करणे गरजेचे आहे अशी सूचना देण्यात आली. अप्पर पोलीस अधीक्षक बीबी महामुनी यांच्या अध्यक्षतेखाली सदर बैठक संपन्न झाली. यावेळी ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार माधवराव गरुड, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांची उपस्थिती होती. बैठकीमध्ये शहरातील विविध मंगल कार्यालयाचे मालक व व्यवस्थापक सहभागी झाले होते. त्यामध्ये बुलढाणा अर्बन रेसिडेन्सी, राजे लॉन्स, नर्मदा हॉलिडेज, रामजी सेलिब्रेशन , येडाई लॉन्स, साईकृपा लॉन्स, आराध्या लॉन्स, राधा गोविंदा सेलिब्रेशन, मातृ मंडळ, अजिंक्य वैभव कार्यालय, तिरुपती मंगल कार्यालय , ओंकार लॉन्स या मंगल कार्यालयाच्या प्रतिनिधींनी तसेच मालकांनी बैठकीदरम्यान पोलिसांशी संवाद साधला.

# जुन्या वादातून दोन गटांमध्ये तुफान हाणामारी

## १२ जणांवर गुन्हे दाखल...

**जनसंचलन/ संग्रामपूर**

जुन्या कारणावरून लग्नात वाद करून दोन गटांत जोरदार हाणामारी झाल्याची घटना गुरुवारी दुपारी तीन वाजता दरम्यान सोनाळा येथे घडली. या हाणामारीत तीन जण गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर अकोला येथील रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती आहे.सोनाळा येथे लग्नात नातेवाईकांमध्ये उद्भवलेला वाद विकोपाला गेला. शाब्दिक चकमकीचे रूपांतर हाणामारीत झाले. परस्परांनी हातात लाठ्या, काठ्या, फावड्याचा दांड्याने एकमेकांना मारहाण केली. नातेवाईकांमध्ये काही दिवसांपूर्वी मुंबई येथे वाद झाला होता. त्या जुन्या वादावरून लग्नात नातेवाईकांमध्ये जोरदार हाणामारी झाली. या हाणामारीत सुनील साहेबराव सोळंके, संजय साहेबराव सोळंके, साईनाथ दादाराव शिंदे हे तीन जण गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर अकोला येथील रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. याप्रकरणी सोनाळा पोलीस ठाण्यात साईनाथ दादाराव शिंदे व किसन ज्योतीराव चव्हाण या दोघांनी दिलेल्या



परस्पर विरुद्ध फिर्यादीवरून आरोपी सुभाष भानुदास सोळंके, देवनांद किसन चव्हाण, परमेश्वर किसन चव्हाण, ईश्वर किसन चव्हाण, अर्जुन मंगल सोळुंके, किरण मंगल सोळंके, सुनील साहेबराव सोळंके, संजय साहेबराव सोळंके, अनिल साहेबराव सोळंके, अंबादास साहेबराव सोळंके, विजय साहेबराव सोळंके, साहेबराव दौलत सोळंके या १२ आरोपींवर कलम १४३, १४७, १४८, १४९, ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६ भादंविनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. यातील ५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सोनाळा पोलिस ठाण्यातील पोलिस हेकॉ विनोद वानखडे करत आहेत.

# महिलेची १२ लाख ७९ हजार रुपयांनी केली फसवणूक...

**वृत्तसंस्था/नागपूर**

फसवणुकीची रक्कम परत मिळवून देण्यासाठी ब्लॅकमेल करून सायबर गुन्हेगारांनी औषध विक्रेत्या महिलेचे बँक खाते, एटीएम व सिमकार्डचा वापर केल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेने नागपूर पोलिसांमध्ये खळबळ उडाली आहे. याप्रकरणी अजनी पोलिसांनी जेम्स व जॉन जलालुद्दीन या दोघांविरुद्ध फसवणूक व माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल केला. ५२वर्षीय महिलेच्या तक्रारीवरुन हा गुन्हा दाखल करण्यात आला.पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, महिलेचे औषधविक्रीचे दुकान असून, तिचा पती मराठवाड्यातील बँक ऑफ बडोद्यात वरिष्ठ व्यवस्थापक आहे. नोव्हेंबर २०२२मध्ये महिलेला आंतरराष्ट्रीय कॉल आला.तुमचे सोन्याचे पार्सल असून, त्यासाठी ३५ हजार रुपये द्यावे लागतीलफ असे सांगण्यात आले. महिलेने सायबर गुन्हेगाराच्या खात्यात ३५ हजार रुपये जमा केले. त्यानंतर वेळोवेळी गुन्हेगाराने पैशांची मागणी केली.औषध विक्रेत्या महिलेने एकूण दीड लाख रुपये जमा केले. मात्र, त्यांना सोन्याचे पार्सल मिळाले नाही. त्यानंतर डिसेंबर महिन्यात विल्यियम पर्सी याने महिलेच्या व्हॉट्सॲपवर संपर्क साधला. फसवणूक झालेली रक्कम परत मिळवून देण्याचे आमिष दाखविले.नंतर त्यानेही महिलेची १२ लाख ७९ हजार रुपयांनी फसवणूक केली. याप्रकरणी सायबर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. मार्च २०२३मध्ये स्टार मेकर ॲपवर महिलेची जेम्स याच्यासोबत ओळख झाली.महिलेने जेम्सला फसवणूक झाल्याची माहिती दिली. त्यानेही पैसे परत मिळवून देण्याचे आमिष दाखविले. त्यानंतर दोघे सतत व्हॉट्सॲपवर चॅट करायला लागले.एटीएम अडकल्याने माझा पगार थांबवला आहे. तुमचे एटीएम व सिमकार्ड द्या, मी तुम्हाला मदत करेलफ असे आमिष जेम्सने दाखविले. महिलेने नवीन सीमकार्ड खरेदी करून बेस्यातील स्टेट बँक ऑफ इंडियात खाते उघडले. त्यानंतर महिलेने सायबर गुन्हेगाराने दिलेल्या दिल्लीतील पत्यावर पॅनकार्ड, आधारकार्ड, एटीएम कार्ड, सिमकार्ड



व दोन छायाचित्रे पाठविली. याचा वापर करून जेम्स व जॉन जलालुद्दीन या दोघांनी सायबर फसवणुकीची रक्कम महिलेच्या बँक खात्यात जमा करून ती अन्यत्र वळवली.महिलेला १ एप्रिल रोजी बेंगळुरू पोलिसांनी पोलिस ठाण्यात हजर राहण्याची नोटीस बजावली. त्यामुळे महिला घाबरली. त्यानंतर ती बेंगळुरू पोलिस ठाण्यात गेली. जेम्सने अशाचप्रकारे अनेक महिला व पुरुषांच्या खात्याचा वापर करून फसवणुकीचा पैसा त्यांच्या खात्यात जमा करून काढल्याचे महिलेला कळाले. महिलेने अलीकडेच अजनी पोलिस ठाण्यात झालेल्या जनता दरबारात पोलिस सहआयुक्त अस्वती दोरजे यांच्याकडे तक्रार केली. दोरजे यांच्या आदेशानंतर अजनी पोलिसांनी गुन्हा दाखल केला.